ePaper
अजित पवार मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार?: अमोल मिटकरी



| वर्ष - 7 | अंक - 81 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आजच्या अंकासोबत



दादामाणूसः
अजितदादा पवार
वाढदिवस विशेषांक
पाने 8+8

www.mahaenews.com | शनिवार , दिनांक 22 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# उपयोगकर्ता शुल्क वसुलीला स्थगिती!

## आमदार लांडगेंची लक्षवेधी : सरकारचा पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा

### » आमदार महेश लांडगे यांचा मागणीला यश

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवडमध्ये महापालिका प्रशासनाकडून सुरू असलेली उपयोगकर्ता शुल्काची दंड वसुलीला अखेर स्थगिती मिळाली आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीमध्ये याबाबत सविस्तर बैठक घेण्यात येईल आणि तोपर्यंत ही वसुली थांबवावी, असा मोठा निर्णय कॅबिनेट मंत्री डॉ. उदय सामंत यांनी घेतला. त्यामुळे सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा मिळाला आहे.**





आमदार महेश लांडगे यांनी उपयोगकर्ता शुल्क रद्द करावे आणि वसुल केलेली दंडाची रक्कम रद्द करावी. या मागणीसाठी पावसाळी अधिवेशनामध्ये लक्षवेधी सादर केली आणि प्रखरपणे भूमिका मांडली. त्यामुळे राज्य सरकारला निर्णय घ्यावा लागला. राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने घनकचऱ्याची हाताळणी व व्यवस्थापन करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी उपयोगकर्ता शुल्क आकारणी करावी, अशी अधिसूचना दि. १ जुलै २०१९ रोजी जाहीर केली होती. मात्र, गेल्या चार वर्षात याबाबत महापालिका प्रशासनाने अंमलबजावणी केली नाही. आता दंडासहीत उपयोगकर्ता शुल्क वसुली सुरू केली आहे. त्यामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी असा नवा संघर्ष निर्माण झाला आहे. याबाबत आमदार लांडगे यांनी आक्रमकपणे शहरवासीसांची बाजू सभागृहात मांडली. महापालिका प्रशासन शहरातील प्रति मालमत्ता ६० रुपये प्रतिमहा अशा प्रमाणे वार्षिक ७२० रुपये अशी दि. १ जुलै २०१९ पासून 'उपयोगकर्ता शुल्क व दंड' वसुली सुरू केली आहे.

आतापर्यंत सुमारे ३५ कोटी रुपये दंड वसुली झाली आहे. गेल्या चार वर्षांतील सुमारे १५३ कोटी रुपये थकीत वसुलीची आकडेवारी आहे. राज्य सरकारच्या निर्णयामुळे या वसुलीला आता स्थगिती मिळाली आहे. उपयोगकर्ता शुल्क आकारणीबाबत दि.१ जुलै २०१९ रोजी महाराष्ट्र सरकारने अधिसूचना जाहीर केली आहे. त्याची अंमलबजावणी पिंपरी-चिंचवडमध्ये २०२३ मध्ये केली जात आहे, या विलंबाला जबाबदार कोण? लोकांचे प्रश्न आम्ही सोडवण्यासाठी सभागृहात येतो. तुम्ही आमचा प्रश्न ऐकून घेतला पाहिजे. आम्हाला लोकांनी अन्य मतदार संघातील प्रश्न ऐकून घेण्यासाठी नव्हे, तर त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी पाठवले आहे. त्यामुळे सभागृहाला माझी भूमिका ऐकून घ्यावी लागेल, आक्रमक पवित्रा आमदार लांडगे यांनी घेतला.

### अतिरिक्त शुल्क रद्द करा : आमदार लांडगे



**» पिंपरी-चिंचवडमधील प्रामाणिकपणे मिळकतकर भरणाऱ्या नागरिकांवर २०१९ पासून २०२३ पर्यंत चार वर्षांचा उपयोगकर्ता शुल्क आकारण्यात आला. नवी मुंबई, ठाणे महापालिकेत हे शुल्क आकारले जात नाही, मग पिंपरी-चिंचवड शहरातच का लागू केला जातो. चार वर्षांचा कर मिळकतकर पावतीमध्ये समाविष्ट केला आणि त्यावर दंड लावला, याबाबत सरकारने निर्णय घ्यावा. तसेच, पर्यावरणपूरक सोसायटीधारक मिळकतधारकांना हा कर का लावला आहे? असा प्रश्न उपस्थित केला. ३ लाखांहून अधिक कुटुंबांवर लादलेला हे अतिरिक्त शुल्क रद्द करावे, अशी ठाम भूमिका आमदार लांडगे यांनी मांडली.**

> “ स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या हद्दीतील मिळकतधारकांकडून कर वसुली करते. त्या बदल्यात कचरा, पाणी, लाईट, रस्ते अशा सुविधा दिल्या जातात. मग, कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्रपणे शुल्क वसुली करणे योग्य नाही. शास्तीकर पूर्ण माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्या धर्तीवर उपयोगकर्ता शुल्क वसुलीचा निर्णय कायमस्वरुपी रद्द करावा आणि पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा द्यावा, अशी सभागृहाला विनंती केली आहे. याबाबत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक होणार असून, तोपर्यंत शासनाने उपयोगकर्ता शुल्क वसुलीला स्थगिती दिली आहे.
>
> – **महेश लांडगे,** आमदार, भाजपा.

### पैलवान लांडगेंचे ऐकावेच लागेल...

*» उपयोगकर्ता शुल्कबाबतच्या लक्षवेधी लागावी आणि त्यामधून पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा मिळावा म्हणून आमदार लांडगे आग्रही होते. चार तास प्रतीक्षा केल्यानंतर लक्षवेधीवर चर्चेला वेळ दिला जात नाही, हे लक्षात आल्यानंतर आमदार लांडगे यांचा संताप अनावर झाला. त्यांनी सभागृहाला खडे बोल सुनावले. यामुळे कॅबिनेट मंत्री डॉ. उदय सामंत यांनी सकारात्मक पुढाकार घेतला. "आमदार लांडगे यांनी प्रभावीपणे पिंपरी-चिंचवडचा मुद्दा मांडला. अन्य लक्षवेधींसाठी वेळ खर्ची झाल्यामुळे त्यांची चिडचिड झाली. त्यांची पार्श्वभूमी पैलवान असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकावेच लागेल" असा उल्लेख करीत डॉ. उदय सामंत यांनी सकारात्मक भूमिका घेतली.*

# जिल्ह्यात नवीन आजाराचा उद्रेक!

## » साथ आटोक्यात आली नाहीतर शाळा बंद करण्याचा प्रस्ताव

### » आळंदीत चार दिवसांत आढळले 1560 रुग्ण

। पुणे/ जेजुरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून नवीन आजाराची साथ सुरु झाली आहे. ही साथ गंभीर होत आहे. यामुळे आरोग्य यंत्रणेची धावपळ सुरु झाली आहे. नॅशनल इंस्टीट्यूट ऑफ व्हायरोलॉजी आणि जिल्हा शल्य चिकित्सक साथ असलेल्या आळंदीत जाणार आहे. तसेच ही साथ आटोक्यात आली नाही तर शाळा बंद करण्याचा प्रस्ताव आरोग्य विभाग प्रशासनाला देणार आहे. चारच दिवसात 1560 रुग्ण या साथीचे आढळले आहेत.**



पुणे जिल्ह्यातील आळंदी नगरपालिकेत डोळ्यांची साथ सुरु झाली आहे. आळंदी येथील वारकरी मुलांच्या बुबुळांना त्रास होत आहे. आळंदीतील विविध संस्थानामध्ये राहणाऱ्या मुलांमध्ये डोळ्याच्या साथीचा मोठा प्रादुर्भाव गेल्या चार दिवसांपासून सुरु झाला आहे. चार दिवसांत तब्बल 1560 रुग्ण समोर आले आहे. या आजाराचे सोमवारी 450 रुग्ण आढळले. त्यानंतर मंगळवारी संख्या जवळपास दुप्पट वाढत नवे रुग्ण 740 झाली. पुन्हा बुधवारी 210 रुग्ण आढळले आहेत. गुरुवारी 160 रुग्ण आढळून आले आहेत. आळंदीत शाळकरी मुलांमध्ये आलेल्या साथीमुळे नॅशनल इंस्टीट्यूट ऑफ व्हायरोलॉजी म्हणजेच NIV चे पथक आणि जिल्हा शल्य चिकित्सक घटनास्थळी जाणार आहे. या ठिकाणी पाहणी करुन निर्णय घेणार आहे. आरोग्य विभागाने या आजाराच पुढील उद्रेक टाळण्यासाठी सर्व खबरदारीच्या उपाययोजना सुरु केल्या आहेत.

### तर शाळा बंदचा प्रस्ताव

» आळंदीमधील घटनेच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड आणि लगतच्या ग्रामपंचायतींमध्ये तपासणी सुरु केली आहे. या ठिकाणी सर्व घरांची तपासणी केली जात आहे. आळंदी ग्रामीण रुग्णालयात दोन नेत्रतज्ज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व मुलांवर उपचार मोफत केले जात आहेत. आज आढळलेल्या नवीन प्रकरणांची संख्या कमी झाली नाही, तर शाळा बंद ठेवण्याचा प्रस्ताव देणार आहे. यासंदर्भातील रुग्णांची स्वतंत्र व्यवस्था केली जाणार आहे. परंतु मुलांमध्ये आढळणाऱ्या या साथीमुळे पालकांमध्येही चिंता निर्माण झाली आहे.

---

# ‘शासन आपल्या दारी’ पुन्हा रद्द

## » कार्यक्रमाला मुहूर्त लागेना; चौथ्यांदा रद्द

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील जेजुरी येथे होणाऱ्या ‘शासन आपल्या दारी’ कार्यक्रमाला काही केल्या मुहूर्त लागत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. आता हा कार्यक्रम चौथ्यांदा पुढे ढकलण्यात आला आहे. राज्यातील वेगवान राजकीय घडामोडींमुळे हा कार्यक्रम तीनवेळा पुढे ढकलण्यात आला होता, तर आता हवामान विभागाने पुणे जिल्ह्याला मुसळधार पावसाचा लाल इशारा दिल्याने कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे.**




विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळण्यासाठी विद्यमान राज्य सरकारने ‘शासन आपल्या दारी’ हा उपक्रम आणला आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांत हा कार्यक्रम घेण्यात येत आहे. त्याप्रमाणे पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील जेजुरी येथे हा कार्यक्रम ३ जुलै रोजी आयोजित करण्यात आला होता. मात्र, राज्याचे विरोधी पक्षनेते असलेल्या अजित पवार यांनी पदाचा राजीनामा देत राज्य सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. परिणामी ३ जुलैऐवजी ८ जुलै ही तारीख मंत्रालयातून जिल्हा प्रशासनाला देण्यात आली होती.

मात्र, मंत्रिमंडळ विस्तारामुळे ऐनवेळी ही तारीखही रद्द करत १३ जुलै ही नवी तारीख कार्यक्रमासाठी देण्यात आली होती. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या दिल्ली दौऱ्यामुळे हा कार्यक्रमही पुढे ढकलण्यात आला होता. दरम्यान, हवामान विभागाने जिल्ह्यात मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे.

### हवामान खात्याच्या अंदाजाने रद्द

» हवामान विभागाने शनिवारी लाल इशारा आणि पुढील तीन दिवस नारंगी इशारा दिला आहे. त्यामुळे जेजुरी येथे २३ जुलै रोजी होणारा ‘शासन आपल्या दारी’ कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. जिल्ह्याच्या घाट क्षेत्रातील पावसाची स्थिती आणि पुढील काही दिवसाचा हवामान अंदाज लक्षात घेता लाभार्थ्यांना कार्यक्रम स्थळापर्यंत येण्यास कोणताही त्रास होऊ नये यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्री जनकल्याण कक्षातर्फे कळविण्यात आले आहे.

# आरटीईच्या शुल्काची शाळांना प्रतीक्षा

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) खाजगी शाळांमध्ये २५ टक्के जागांवर प्रवेशित विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून केली जाते. २०२२-२३ आणि २०२३-२४ या दोन वर्षांच्या शुल्क प्रतिपूर्तीसाठी राज्य शासनाने केवळ ४० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, आधीच्या थकित शुल्क प्रतिपूर्ती खासगी शाळांना आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.**




आरटीईअंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती थकल्याची तक्रार खासगी शाळांकडून वारंवार करण्यात येते. थकित रक्कम मिळण्यासाठी अनेकदा निवेदनेही देण्यात आली. यंदा थकित शुल्क प्रतिपूर्ती न झाल्यास विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही अशी भूमिका शाळांकडून करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर २०२३-२४ या वर्षात आरटीई शुल्क प्रतिपूर्तीसाठी दोनशे कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. शिक्षण संचालकांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी ४० कोटी रुपयांच्या मंजुरीचा शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने प्रसिद्ध केला. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी जिल्ह्यांनी केलेल्या वाजवी मागणीच्या प्रमाणात निधी वितरित करावा. वितरित केलेल्या निधीचा विनियोग केवळ २०२२-२३ आणि सन २०२३-२४ या वर्षातील शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्तीसाठी करावा. या पूर्वीच्या प्रलंबित शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी स्वतंत्रपणे निधीची तरतूद करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांना आता 'भारत दर्शन'

## आयुक्त शेखर सिंह यांची माहिती : महापालिका प्रशासनातर्फे मेळावा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम शिक्षक करतातच, पण पालकांनीही आपल्या पाल्यासोबत रोज संवाद साधावा तसेच त्याच्या अभ्यासाकडे, आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक यांनी केले.**




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्राथमिक आणि माध्यमिक शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, अधिकारी तसेच विद्यार्थी, पालक यांच्या मेळाव्याचे आयोजन चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये करण्यात आले होते यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त सिंह बोलत होते. या मेळाव्यास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उप आयुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आणि मुख्याध्यापक, शिक्षक संवर्ग, पालक वर्ग, विद्यार्थी तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीने पालकांपर्यंत सुचना पोहोचवल्या पाहिजेत. पालकांनीही आपल्या पाल्याला विश्वासात घेऊन त्यांच्या भविष्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे.

विद्यार्थ्यांचा अभ्यास, आरोग्य, शारिरिक, सर्वांगीण प्रगतीबाबत पालकांनी संवाद साधला पाहिजे तसेच थोडा वेळ काढून आपल्या पाल्याच्या आहाराकडे, अभ्यासाकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या पाल्याचा कल, त्याच्यातील प्रतिभा ओळखून पालकांनी त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. व्यवस्थापन समिती आणि शिक्षकांचीही त्यामध्ये महत्वाची भूमिका आहे. आपला केंद्रबिंदू हा आपल्या शाळेतील विद्यार्थी आहे ज्याला आपल्याला घडवायचं आहे.

त्याचा शारिरीक, बौद्धिक, मानसिक विकास कसा होईल यावर लक्ष केंद्रित करा. तसेच शाळेत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अन्नाची गुणवत्ता योग्य आहे का आणि नसेल तर त्यावर त्वरित योग्य ती पाऊले उचलून गुणवत्ता कशी वाढवता येईल याकडे विशेष लक्ष व्यवस्थापन समिती आणि मुख्याध्यापकांनी दिले पाहिजे. मुख्याध्यापकांना आणि शिक्षकांना महापालिका चांगल्या नियोजनासाठी सहाय्य करत असते.

व्यवस्थापन समिती किंवा पालकांनी केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार करून याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत नाव आलेल्या १० विद्यार्थ्यांचा यावेळी आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

त्यामध्ये युवराज राठोड, वाजित शेख, क्षितीज कामने, शायद शेख, आराध्या चव्हाण, त्रिषा शिरसाठ, परिक्षा ठाकूर, दत्तप्रसाद वाळेकर, महेंद्रकुमार महातो, प्रगती बडगे या विद्यार्थ्यांच्या समावेश आहे. शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांना आयुक्तांनी शुभेच्छा दिल्या तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे प्रतिनिधी, सदस्य तसेच शिक्षक आणि पालकांनी मांडलेल्या सूचनांवर आयुक्त शेखर सिंह यांनी त्यांच्याशी संवाद साधला. या मेळाव्याचे प्रास्ताविक शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी केले आणि शालेय उपक्रमांची तसेच मेळाव्यासंबंधित सविस्तर माहितीही त्यांनी दिली.

### गुणवंतांचा होणार सन्मान...

» ज्या १० विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळवून शिष्यवृत्ती मिळवली त्यांना महापालिकेच्या वतीने भारत दर्शनासाठी पाठविण्यात येणार आहे. या सहलीमध्ये काही शिक्षकांचाही समावेश असणार आहे. हा उपक्रम पुढेही राबविण्यात येईल आणि जे शिक्षक चांगले काम करतील त्यांना गुणवंत विद्यार्थ्यांसमवेत पाठविण्यात येईल तसेच त्यांचा सन्मान करण्यात येईल असेही आयुक्त शेखर सिंह यावेळी म्हणाले.

### पालकांना मोबाईलवर आरोग्य अहवाल...

» महापालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती देताना अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले, महापालिकेच्या सर्व शाळांतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येणार असून त्याची सर्व माहिती त्यांच्या पालकांना देण्यात येणार आहे. त्यामध्ये रक्त तपासणी, शारीरिक आजार, अपंगत्व अशा सर्व गोष्टींची तपासणी करण्यात येणार असून विद्यार्थ्याला कोणत्याही आजाराची लक्षणे आढळली तर त्याला चांगल्या रुग्णालयात दाखल करून त्याच्यावर वेळेत योग्य ते उपचार करण्यात येतील. महापालिका थेट पालकांच्या मोबाईलवर पाल्याचा आरोग्य अहवाल पाठवणार आहे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोषक अन्न पुरविणे आणि त्याची गुणवत्ता चांगली ठेवणे गरजेचे आहे. शिक्षकांनी आणि मुख्याध्यापकांनी याकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. व्यवस्थापन समिती आणि शाळांनी समन्वय साधून या सर्व गोष्टींची काळजी घेतली पाहिजे आणि विद्यार्थ्यांना रोज शाळेत येण्यासाठी कसे प्रोत्साहन देण्यात येईल किंवा कोणकोणत्या उपाययोजना राबविण्यात येतील याच्यावरही काम केले पाहिजे.

# 'पीएमआरडीए' प्रारुप 'डीपी' रखडला!

## सरकारच्या मंजुरीची प्रतीक्षा : हरकतींच्या सुनावणीचा मार्ग मोकळा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) प्रारूप विकास आराखडा राज्य सरकारकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ मिळाली आहे. त्यामुळे आराखड्याबाबत प्राप्त ६९ हजार हरकतींची छाननी करून हरकतदारांना न्याय देण्याचे काम सुकर होणार असल्याचा दावा पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) प्रारूप विकास आराखडा ३० जुलै २०२१ रोजी प्रकाशित करण्यात आला. त्यावर ६९ हजार नागरिकांच्या हरकती, सूचना प्राप्त झाल्या. दरम्यान, दाखल हरकती-सूचनांवर सुनावणी घेण्यासाठी राज्य सरकारकडून डिसेंबर २०२१ मध्ये तज्ज्ञांची समिती गठीत करण्यात आली. दाखल हरकती-सूचनांचे नियोजन करून समितीने २ मार्च २०२२ पासून सुनावणी घेण्यास सुरुवात केली. डिसेंबर २०२२ मध्ये समितीकडून सुनावणीचे काम पूर्ण करण्यात आले. त्यानंतर जानेवारी- २०२३ मध्ये आराखड्यावर संस्थात्मक आणि लोकप्रतिनिधींची सुनावणी घेण्यात आली. अशा प्रकारे विकास आराखड्यावरील सुनावणीचे काम दोन महत्त्वपूर्ण टप्प्यात समितीकडून पूर्ण करण्यात आले. एकूण ८१४ गावांसाठी हा प्रारूप विकास आराखडा बनविण्यात आला. पीएमआरडीएचा प्रारूप विकास आराखडा राज्य सरकारकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यापूर्वी महानगर नियोजन समिती आणि कार्यसमितीसमोर मांडण्यात येणार आहे. या समित्यांकडून मंजुरी मिळाल्यानंतर हा आराखडा राज्य सरकारच्या अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. आराखडा पाठविण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ मिळाली आहे, अशी माहिती पीएमआरडीएचे उपजिल्हाधिकारी रामदास जगताप यांनी दिली.

> " पीएमआरडीएचा प्रारूप विकास आराखडा राज्य सरकारकडे पाठविण्यासाठी मुदतवाढ मिळाली आहे. त्यामुळे या आराखड्याबाबत दाखल ६९ हजार हरकतींची छाननी करून हरकतदारांना न्याय देण्याचे काम सुकर झाले आहे.
>
> – **विवेक खरवडकर,** महानगर नियोजनकार, पीएमआरडीए

## दलदलीत अडकलेल्या व्यक्तीची सुटका

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

निगडी प्राधिकरण येथे दलदलीत अडकलेल्या एका व्यक्तीची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली. निगडी प्राधिकरण येथील मूकबधिर शाळेजवळील परिसरात असलेल्या दलदलीमध्ये एक गृहस्थ रूतले असल्याचे आरोग्य विभागाचे कर्मचारी विशाल साळवे यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ ही वर्दी प्राधिकरण उप अग्निशमन केंद्राला कळवली. शिडी, दोर, सीलिंग आणि हुकच्या साहाय्याने पथकाने दलदलीत रुतलेल्या व्यक्तीची सुखरूपपणे सुटका केली.




# मानवनिर्मित वास्तव



**बेसावध क्षणी नांदती, जिवंत गावे गडप होतात. खळबळ माजते. मदतीचे हात सरसावतात. गावात, परिसरात शिल्लक राहिलेले हात मिळेल तो आधार धरून पुन्हा उभे राहतात. बऱ्या-वाईटाच्या चर्चा झडतात. कालांतराने त्याही गाडल्या जातात.**

उरतो चिखल, निसर्ग विरुद्ध माणसाच्या चढाओढीत माणसाचा क्षुद्रपणा, त्याची जाणीव असूनही निसर्गाला गृहीत धरण्याचा उद्दामपणा आणि निर्विकार व्यवस्था. दरड कोसळून मातीच्या ढिगाऱ्याखाली गावेच्या गावे गडप होण्याच्या अपवादात्मक दुर्घटना आता सातत्याने घडत आहेत. माळीण, तळीये आणि आता इरशाळवाडी. पुणे जिल्ह्यातील माळीण गाव २०१४ साली दरड आणि मातीच्या ढिगाऱ्याखाली गडप झाले. गावातील ७४ पैकी ४४ घरांचा मागमूसही राहिला नाही. दोन वर्षांपूर्वी रायगडमधील तळीये गावात दरड कोसळली त्यात जवळपास ८४ नागरिकांना प्राण गमवावे लागले. त्यापूर्वी २००५ साली डोंगरकडा कोसळल्यामुळे महाड तालुक्यातील पाच गावांचे नुकसान झाले होते. त्यातही शेकडो नागरिकांचे प्राण गेले होते. आता इरशाळवाडीचे अस्तित्वही दरडीखाली गाडले गेले आहे. याशिवायही कोकणातील छोट्या-मोठ्या गावांमध्ये दरडी कोसळण्याचे प्रकार दरवर्षीच कमी -जास्त प्रभावाने घडतात. अगदी महानगर मुंबईही त्याला अपवाद नाही. विविध अभ्यास समित्यांच्या अहवालानुसार राज्यातील जवळपास १५ टक्के भूभाग दरड प्रवणक्षेत्रात मोडतो. नाशिक, ठाणे, रायगड, मुंबई, पुणे, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये धोका अधिक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण संस्थेच्या नोंदीनुसार कोकण आणि पश्चिम घाट क्षेत्रातील ०.०९ दशलक्ष चौ. किमीचे क्षेत्र हे दरडप्रवण क्षेत्र आहे. त्यात महाराष्ट्रातील मोठ्या क्षेत्राची गणना होते. या नोंदी नव्या नाहीत. वर्षांनुवर्षांच्या आहेत. या डोंगरदऱ्यांच्या कुशीत वसलेली गावेही नेमके मूळ नोंदवता येऊ नये इतकी जुनी आहेत. या गावांचा परिसर दुर्गम आणि निसर्ग-प्रकोपाचा धोका उरी बाळगूनच आहे, हे वास्तवही नवे नाही. प्रश्न आहे तो हे बदलता न येणारे वास्तव स्वीकारून आवश्यक व्यवस्था निर्माण करण्याचा. तज्ज्ञांच्या मतानुसार दरडी अचानक कोसळत नाहीत. माती ढासळणे, दगड, धोंडे घरंगळणे असे संकेत आधी मिळत असतात. मात्र संकेत मिळाले तरी पिढ्यानपिढ्यांचे अस्तित्व टिकवणारे गाव सोडणे, स्थलांतरित होणे म्हणजे कदाचित निर्वासित होणे हे भावनिक आव्हान माणसांना न पेलवणारे असते. राज्यात वारंवार दरडी कोसळण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नेमण्यात आलेल्या विविध समित्यांनी दिलेल्या अहवालातील समान मुद्दा होता तो डोंगरांच्या सपाटीकरणाचा. मातीची धूप, डोंगरांची धूप, झीज या संकल्पना, उपाय याचे तपशील गेल्या दोन-तीन पिढ्यांनी परिसर अभ्यास किंवा भूगोलाच्या परीक्षेसाठी घोकले आहेत. प्रत्यक्षात त्याचा वापर होताना दिसत नाही. दरडी कोसळण्यामागे मानवनिर्मित कारणे मोठ्या प्रमाणावर असल्याचे मत तज्ज्ञांकडून वारंवार मांडण्यात आले आहे. डोंगरांचे सपाटीकरण, चर खणणे, वणवे, डोंगरमाथ्यावरील वृक्षतोड, मोठ्या यंत्रांच्या साहाय्याने डोंगर पोखरणे अशी कारणेही अशा दुर्घटनांमागे आहेत, असे अभ्यासकांचे मत आहे. कोकणातील घाट- माथ्यांवर कमी वेळात खूप पाऊस पडतो, त्यामुळे धोका वाढतो. या सगळ्या घटकांचा विचार व्यवस्थेच्या पातळीवर मात्र होत नसल्याचे वारंवार होणाऱ्या दुर्घटनांवरून दिसते. कोणत्या क्षेत्रात किती पाऊस पडू शकेल, तेथे काय परिणाम होईल याचा अंदाज बांधणाऱ्या प्रभावी यंत्रणा कार्यरत नाहीत. हानी होऊ नये यासाठी उपाययोजना नाहीत आणि दुर्घटनाप्रवण क्षेत्राचा विचार करून तेथे तातडीने मदत किंवा व्यवस्था उभी करता यावी याचीही तयारी आपल्याकडे नाही ही दुर्घटनांच्या वाढत्या प्रमाणाइतकीच काळजीची बाब आहे.

## संपादकीय »

# नागडे कोण?

*विद्यमान सरकारच्या कोणत्याही अपयशापासून सुरक्षित अंतरावर राहणाऱ्या रा.स्व. संघालाही मणिपुरातील परिस्थितीबाबत भाष्य करावे लागले...*

ही घटना अशी की तिचा निषेध, धिक्कार करण्यास भाषाकोविदही योग्य शब्दांअभावी सुन्न होतील. हे असे व्हावे असे काय घडले? त्या राज्यातील दोन समुदायांत कित्येक महिन्यांची तेढ आहे. त्यातून उफाळलेल्या हिंसाचारात अनेकांचा बळी गेलेला आहे.

अशा वेळी अप्रत्यक्ष सरकार समर्थक जमावातील गुंडांची एक तुकडी दुसऱ्या समाजाच्या वस्तीवर सशस्त्र हल्ला करते. त्यास घाबरून स्थानिक महिला पळून जातात. स्थानिक पोलीस त्यांना गाठून सरकारी यंत्रणेद्वारे सुरक्षित स्थळी नेऊ लागतात.

या मार्गातील एक वस्ती हल्लेखोर समाजाची. तेथून जात असताना हा समाज त्या महिलांवर हल्ला करतो. त्यांना पोलीस बंदोबस्तातून वेगळे केले जाते. सज्जन पोलीस ते होऊ देतात. मग जमाव त्यातील एकीच्या वडिलांस ठार करतो. या महिलांना विवस्त्र करतो.

**काळ्या समुद्रामार्गे युक्रेनमधील धान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीस विनाअडथळा संमती देण्याविषयीच्या करारातून बाहेर पडत असल्याचे रशियाने सोमवारी जाहीर केले. याच दिवशी रशियाला क्रिमिया या युक्रेनच्या रशियाव्याप्त प्रांताशी जोडणाऱ्या पुलावर झालेला हल्ला आणि हा निर्णय यांचा परस्परांशी संबंध नसल्याचा खुलासा रशियाने केला आहे.**

# पुन्हा धान्यसंकटाची चिंता

हा हल्ला युक्रेनच्या सैन्यदलाकडून झाला असावा, अशी शक्यता त्या देशाच्या गुप्तचर यंत्रणेने बीसीसी वाहिनीकडे व्यक्त केली आहे. खरे तर या कराराची मुदत रविवारी रात्री संपतच होती. त्याला मुदतवाढ मिळावी असा संयुक्त राष्ट्रे आणि तुर्कीचा प्रयत्न होता. त्यांच्याच प्रयत्नांनी गतवर्षी जुलै महिन्यात हा करार अमलात आला. परंतु या करारातील आम्हाला अभिप्रेत असलेल्या अटींचे पालन झालेले नाही, असे रशियाचे म्हणणे आहे. एकीकडे युक्रेनच्या धान्याला सुरक्षित निष्कास पुरवतानाच, रशियातील धान्य व अन्य सामग्रीच्या निर्यातीवरील निर्बंधमार्गही खुले करावेत, अशी रशियाची मागणी होती. ती पूर्ण झाली नाही, अशी रशियाची तक्रार आहे. 'करारातून बाहेर पडणार' याचा थेट अर्थ यापुढे काळ्या समुद्रातील ओडेसा व इतर युक्रेनियन बंदरांतून निघणाऱ्या जहाजांच्या सुरक्षिततेची हमी देण्याची जबाबदारी रशियावर राहणार नाही. म्हणजेच धान्य,



खते घेऊन जाणाऱ्या या जहाजांनाही रशियाकडून लक्ष्य केले जाऊ शकते. रशियाविरुद्ध युक्रेनच्या भूमीवर गेल्या काही महिन्यांत मिळालेल्या यशामुळे आत्मविश्वास दुणावलेल्या युक्रेनच्या नेतृत्वाने या धमकीला फार महत्त्व न देण्याचे ठरवलेले आहे. शिवाय जलवाहतुकीच्या पर्यायी स्रोतांचा विचार होईल, असेही सूचित केले आहे. परंतु काळ्या समुद्रात रशियाने युद्धसज्ज संचार सुरू केल्यास त्यांचा सामना करण्याची क्षमता युक्रेनियन नौदलात कितपत आहे, हा एक मुद्दा. शिवाय युक्रेनच्या हमीवर विसंबून तेथील बंदरांतील धान्य व इतर सामग्री उचलण्यास किती खासगी जहाज वाहतूक कंपन्या आणि सागरी विमा कंपन्या पुढे येतील, हा दुसरा मुद्दा. यांची समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत, तोवर या घडामोडीकडे अत्यंत गांभीर्यानेच पाहावे लागेल. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेच्या नोंदीनुसार, जगातील जवळपास ४० देश त्यांच्या गरजेच्या सरासरी ३० टक्क्यांहून अधिक गव्हाच्या आयातीसाठी रशिया आणि युक्रेनवर अवलंबून आहेत. सोमालिया, इरिट्रियासारखे आफ्रिकेतील गरीब देश जवळपास सगळा गहू या दोन देशांमधूनच आयात करतात. शिवाय कोविड महासाथ, वातावरणीय बदल, अंतर्गत यादवीसारख्या घटकांमुळे अनेक माफक कृषी उत्पादक देशांमध्ये पेरणी व मालवाहतुकीत आलेल्या व्यत्ययापायी हे देशही आयात धान्यावर अवलंबून आहेत. युक्रेनवर रशियाने गतवर्षी २४ फेब्रुवारीपासून हल्ला केल्यानंतर काळ्या समुद्रातील युक्रेनच्या बंदरांतून होणारी मालवाहतूक जवळपास पूर्ण स्थगित झाली.

## ।। अभंगवाणी ।।



आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा ।
म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ॥१॥

रात्रंदिस मज पाहिजे जवळी ।
क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)



गतिमान विकासासाठी
'अजितदादा' महाराष्ट्रासाठी !
आमचे प्रेरणास्रोत, मार्गदर्शक
महाराष्ट्र राज्याचे लाडके
उपमुख्यमंत्री
सन्माननीय
श्री. अजितदादा
पवार साहेब
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा.!
-: शुभेच्छुक :-
श्री. मोरेश्वर महादू भोंडवे नगरसेवक पिंपरी चिंचवड मनपा
कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, पिंपरी-चिंचवड




22 जुलै
आश्वासक
लोकाभिमुख
कार्यक्षम
कर्तव्यदक्ष नेतृत्व
दादा..
शतायुषी व्हा!
दूरदृष्टी विकासाची, प्रगती मावळची..
उपजिल्हा रुग्णालय लोणावळा
ग्रामीण रुग्णालय कान्हे
प्रशासकीय इमारत वडगाव मावळ
पोलीस स्टेशन वडगाव मावळ
तळेगाव दाभाडे नगरपरिषद
शासकीय आश्रम शाळा वडेश्वर
• शुभेच्छुक : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मावळ • आमदार सुनिल(आण्णा) शेळके मित्र परिवार

# ज्ञानवापी प्रकरण : सर्वेक्षणाला मान्यता

## वादग्रस्त भाग वगळता उर्वरित कॅम्पसचे सर्वेक्षण केले जाईल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ज्ञानवापी प्रकरणात एएसआय सर्वेक्षणासाठी परवानगी देण्यात आली आहे. वाराणसी कोर्टाने आपला निर्णय देताना म्हटले आहे - वादग्रस्त भाग वगळता उर्वरित कॅम्पसचे सर्वेक्षण केले जाईल. हा निकाल देताना वाराणसी न्यायालयाने मुस्लिम पक्षाची याचिका फेटाळून लावली. मुस्लीम पक्षाने सर्वेक्षणाला स्थगिती देण्यासाठी याचिका दाखल केली होती. सुमारे दीड तास चाललेल्या युक्तिवादानंतर 14 जुलै रोजी जिल्हा न्यायाधीश डॉ.अजय कृष्ण विश्वेश यांनी निर्णय राखून ठेवला होता.**

वाराणसी जिल्हा न्यायाधीशांच्या कोर्टात 14 जुलै रोजी हिंदू पक्षाचे वकील विष्णू शंकर जैन म्हणाले होते - ज्ञानवापी हे आदि विश्वेश्वराचे मूळ स्थान आहे. लाखो लोकांच्या भावना त्याच्याशी जोडल्या गेल्या आहेत. पाहणीदरम्यान पश्चिमेकडील भिंतीवर सापडलेल्या खुणा व अवशेषांवरून ही मंदिराची भिंत असल्याचे सांगण्यात आले.

तोंडी पुराव्याच्या आधारे कोणतीही बाजू ठेवता येत नाही, त्यामुळे सर्वेक्षण अनिवार्य आहे.

आम्ही संपूर्ण कॅम्पसच्या सर्वेक्षणाची मागणी करत आहोत, जेणेकरून सर्वांना कळेल की हा परिसर स्वयंभू आदि विश्वेश्वर मंदिर आहे. मंदिराबद्दल सांगायला कोणी जिवंत नाही, पण इतिहास आहे, जो खूप काही सांगून जातो. सर्वेक्षणानंतर वाराणसीचा हा इतिहास समोर येईल.

ज्ञानवापी संकुलाचे पुरातत्व सर्वेक्षण करणे आवश्यक आहे, अशी विनंती हिंदू बाजूच्या वकिलांनी जिल्हा न्यायाधीशांना केली होती.



त्यामुळे सनातनी हिंदूंमध्ये तणावाचे वातावरण आहे. ज्ञानवापी प्रकरणावरून निर्माण झालेल्या तणावावर शास्त्रोक्त तथ्ये समोर आल्यावर त्यावर सौहार्दपूर्ण तोडगा काढला जाईल. मुस्लीम बाजूनेही यावर सहमती असली पाहिजे आणि सर्वेक्षणामुळे सध्याच्या परिस्थितीला कोणत्याही प्रकारे हानी पोहोचणार नाही. हिंदू बाजूच्या वकिलांनी सादर केले की आर्कोलॉजीचे तज्ज्ञ रडार पेनिट्रेटिंग, एक्स-रे पद्धत, रडार मॅपिंग, स्टायलिस्टिक डेटिंग इत्यादी पद्धती वापरू शकतात.

स्टायलिस्ट डेटिंगमध्ये, बांधकाम शैलीवरून एखाद्या संरचनेच्या जुन्या स्थितीचे मूल्यांकन करून, पुरातत्व तज्ञ स्पष्ट करतात आणि ती रचना कोणत्या कालावधीची आहे हे सिद्ध करतात. ज्ञानवापी कॅम्पसमध्ये कोणत्या काळात, कोणत्या संरचनेसह मंदिर बांधले गेले, हे देखील अहवालात असेल.

### डमरू आणि कमळाची चिन्हे सापडली

ज्ञानवापी येथे सापडलेल्या कथित शिवलिंगाचे वैज्ञानिक सर्वेक्षण आणि कार्बन डेटिंग करण्याच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देत न्यायालयाने म्हटले - या प्रकरणात सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाची बारकाईने तपासणी करावी लागेल. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात मुस्लिम पक्षाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

ज्ञानवापी मशीद व्यवस्थापन समितीच्या वतीने अधिवक्ता हुजेफा अहमदी यांनी ही याचिका दाखल केली होती. मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती पीएस नरसिम्हा आणि केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर त्यावर सुनावणी झाली. हिंदू पक्षाने यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. केंद्र सरकारचे वकील अमित श्रीवास्तवही न्यायालयात हजर झाले. कोर्टात झालेल्या सुनावणीदरम्यान मस्जिद कमिटीच्या वतीने वकील मुमताज अहमद, रईस अहमद आणि अखलाक अहमद यांनी युक्तिवाद केला. हिंदू पक्षातर्फे अधिवक्ता सुधीर त्रिपाठी, सुभाष नंदन चतुर्वेदी, अनुपम द्विवेदी, राज्य सरकारकडून राजेश मिश्रा आणि केंद्र सरकारकडून अमित श्रीवास्तव उपस्थित होते.

# मणिपूर प्रकरणी चौघांना अटक

## आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी : एन. बिरेन सिंह

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मणिपूरमध्ये दोन महिलांना निर्वस्त्र करून धिंड काढल्याप्रकरणी आतापर्यंत 4 आरोपींना अटक करण्यात आली आहे. सर्व आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे मुख्यमंत्री एन.बिरेन सिंह यांनी म्हटले आहे. त्याचवेळी जमावाने गुरुवारी सायंकाळी एका आरोपीचे घर पेटवून दिले.**




> 'हा अपमान संपूर्ण देशाचा आहे. 140 कोटी भारतीयांसाठी लाजिरवाणे आहे. मी सर्व मुख्यमंत्र्यांना कायदा आणि सुव्यवस्था मजबूत करण्यास सांगतो. माता-भगिनींच्या सुरक्षेसाठी कठोर पावले उचला.
> - पंतप्रधान नरेंद्र मोदी

याआधी सकाळी एका आरोपीला तर सायंकाळी एका आरोपीला अटक करण्यात आली. राजधानी इंफाळपासून 35 किमी अंतरावर असलेल्या कांगपोकपी जिल्ह्यात 4 मे रोजी ही घटना घडली. त्याचा व्हिडिओ बुधवारी सोशल मीडियावर व्हायरल झाला.

व्हिडिओमध्ये दोन महिलांना विवस्त्र करून काही लोक घेऊन जात असल्याचे दिसत आहे. त्यांच्यासोबत अश्लील वर्तन केले. या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी सकाळी मणिपूरच्या चुराचंदपूरमध्ये निदर्शने सुरू झाली. हजारो लोकांनी काळे कपडे परिधान करून निदर्शने करत आरोपींच्या अटकेची मागणी केली. महिलांना निर्वस्त्र करून त्यांची धिंड प्रकरणी सुप्रीम कोर्टाने म्हटले की, व्हिडिओ पाहून आम्ही खूप अस्वस्थ झालो आहोत. आम्ही सरकारला पावले उचलण्यासाठी वेळ देतो. तेथे काही झाले नाही तर आम्ही पावले उचलू. त्याचवेळी पीएम मोदी म्हणाले की, या घटनेने 140 कोटी भारतीयांना लाजवलं आहे. कोणत्याही गुन्हेगाराला सोडले जाणार नाही.

मणिपूर पोलिसांनी अपहरण, सामूहिक बलात्कार आणि हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. उर्वरितांचा शोध सुरू आहे. सर्व आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी आम्ही शक्य ते सर्व प्रयत्न करू, असे मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंग यांनी म्हटले आहे.





# 'मणिपूर'मधलं कृत्य घृणास्पद

देशाच्या मणिपूर राज्यातुन एक धक्कादायक व्हिडिओ समोर आला अन् दशभरातस संतापाची लाट उसळली. मणिपूरमधील कुकी आणि मैतेई समुदायांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून हिंसक संघर्ष सुरु आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला दोन महिलांना विवस्त्र करून त्यांची धिंड काढण्यात आली होती. त्यानंतर त्यांना शेतात नेऊन त्यांच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला या घटनेचा व्हिडिओ बुधवारी व्हायरल झाला होता. देशभरातून या आरोपींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती.



या घटनेच्या विरोधात देशभरातुन अनेकांनी संतप्त प्रतिक्रिया होती. याच प्रकराणावर आता भाजप खासदार आणि बॉलिवूड अभिनेत्री हेमा मालिनी यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. खासदार हेमा मालिनी म्हणाल्या, 'मणिपूरमध्ये जे घडलं ते घृणास्पद आहे. या ऐकल्यानंतर घृणा येते. महिलांच्या बाबतीत असं होऊ नये, यावर पंतप्रधान मोदी यांनी उत्तर दिले आहे. विरोधक नेहमी पंतप्रधान मोदींच्या विरोधात बोलतात. त्याचे ते कामचं की मोदींनी काहीही केले की त्याचा विरोध करायचा.' बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री हेमा मालिनी यांचे हे वक्तव्य सध्या सोशल मीडियावर भलतेच चर्चेत आले आहे.

# नरेंद्र मोदींवर पुन्हा येणार बायोपिक



टॉयलेट: एक प्रेम कथा' आणि 'परी' सारख्या चित्रपटांच्या निर्मात्या प्रेरणा अरोरा लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बायोपिक बनवणार आहेत. झूमच्या रिपोर्टनुसार, प्रेरणाला पीएम मोदींवर चित्रपट बनवायचा आहे कारण ते भारतातील सर्वात गतिशील, देखणे आणि सक्षम व्यक्ती आहेत त्यामुळे ती त्यांच्यापेक्षा मोठ्या नायकाचा विचार करू शकत नाही. तिने असेही सांगितले की तिला या चित्रपटात अमिताभ बच्चन यांना कास्ट करायचे आहे कारण तिला वाटते की पंतप्रधान मोदींच्या उंचीला दुसरा कोणताही अभिनेता शोभणार नाही. बिग बींना सुद्धा बॉलिवूड इंडस्ट्रीता शहेनशाह म्हणातात. त्यांनी आजवर एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट बॉलिवूडला दिले आहे. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांच्या जीवनाशी संबंधित काही गोष्टी त्यांच्या बायोपिकमध्ये पाहायला मिळतील, असा प्रेरणा यांनी इशारा दिला.

# शिल्पाच्या हृदयाचे ठोके वाढले

सध्या टोमॅटोचे वाढलेले भाव चर्चेचा विषय आहेत. सुनील शेट्टी आणि उर्फी जावेदसह अनेक सेलिब्रिटींनीही टोमॅटोच्या गगनाला भिडलेल्या किमतीवर प्रतिक्रिया दिल्या आहेत. सुनीलनंतर आता शिल्पा शेट्टीनेही यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. अभिनेत्रीने तिच्या सोशल मीडियावर एक मजेदार व्हिडिओ शेअर केला आहे. व्हिडिओमध्ये शिल्पा शेट्टी एका मॉलमध्ये टोमॅटो खरेदी करताना दिसत आहे. ती टोमॅटो उचलून गालाला लावताच पार्श्वभूमीवर 'धडकन' या अभिनेत्रीच्या चित्रपटाचा डायलॉग ऐकू येतो. 'खबरदार, जो मुझे छूने की कोशिश की। किस हक से तुमने मुझे छुआ। तुम्हारा कोई हक नहीं है मुझ पर'। यानंतर शिल्पा शेट्टीने टोमॅटो जिथून उचलले होते तेथे परत ठेवते. व्हिडिओ शेअर करताना शिल्पाने कॅप्शनमध्ये लिहिले की, 'टोमॅटोच्या किमती माझ्या हृदयाचे ठोके वाढवत आहेत.' या फनी व्हिडिओवर चाहत्यांपासून सेलिब्रिटींपर्यंत सर्वजण मजेशीर प्रतिक्रिया देत आहेत. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की,'टमाटर कह रहा होगा अंजलि, मैं तुम्हें छु लू ये हो नहीं सकता, तुम मुझे छू लो ये मैं होने नहीं दूंगा'। दुसऱ्याने लिहिले, 'मॅडम, तुमच्यासाठी सोन्याचे टोमॅटोही महाग नाहीत'. तर दुसऱ्याने लिहिले, 'मॅडम, तुम्ही टोमॅटोची संपूर्ण फॅक्टरी लावू शकता'. टोमॅटोच्या वाढत्या दरामुळे सर्वसामान्यांसोबतच सेलिब्रिटीही हैराण झाले आहेत. नुकतेच सुनीलने याबद्दल बोलताना सांगितले की, तो आजकाल टोमॅटो कमी खातो. सुनीलच्या म्हणण्यानुसार, लोकांना वाटते की तो इतका मोठा सुपरस्टार आहे तर या गोष्टींचा त्याच्यावर काहीही परिणाम होणार नाही. त्यालाही वाढलेल्या किमतीला सामोरे जावे लागत असल्याचे सुनील सांगतात. अभिनेता अलीकडेच इंडिया टुडेशी संवाद साधताना म्हणाला, 'मी आणि माझी पत्नी माना फक्त एक-दोन दिवसांसाठी भाजी खरेदी करतो. आम्हाला ताज्या भाज्या खायला आवडतात. अलीकडे टोमॅटोचे भाव वाढले आहेत, त्याचा परिणाम आमच्यासारख्या स्वयंपाकघरातील लोकांवर होत आहे.




# रणवीर आईच्या पाया पडला

फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा यांनी काल रात्री मुंबईत एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रणवीर सिंग आणि आलिया भट्ट 'द ब्राइडल कॉउचर' शोमध्ये शोस्टॉपर बनले. रणवीरची पत्नी आणि अभिनेत्री दीपिका पदुकोणही रणवीरची आई अंजू भवनानीसोबत शोमध्ये सहभागी झाली होती. यादरम्यान अभिनेता रॅम्प वॉकदरम्यान थांबला आणि त्याने पत्नी दीपिकाच्या जवळ जात तिच्या गालाचे चुंबन घेतले आणि आईच्या पाया पडत दर्शन घेतले. दीपिका, जान्हवी कपूर, खुशी कपूर, काजोल आणि करण जोहरसह अनेक दिग्गज कलाकार या कार्यक्रमाला उपस्थित होते. व्हिडिओमध्ये रणवीर सिंग शेरवानी आणि ग्लिटरिंग जॅकेटमध्ये रॅम्प वॉक करत होता. दरम्यान, तो अचानक थांबला आणि दीपिकाजवळ गेला आणि तिच्या गालावर किस केला. यानंतर रणवीर आईच्या पायाला स्पर्श करून आशीर्वाद घेताना दिसला. त्यानंतर त्याने पुन्हा रॅम्प वॉक सुरू केला. या व्हिडिओला सोशल मीडियावर खूप पसंती दिली जात आहे. व्हिडिओवर कमेंट करताना चाहत्यांनी रणवीरच्या या हावभावाचे कौतुक केले आहे.

# बाप लेकाचं नातं

आपल्या सशक्त कलाकृतींतून आपला वेगळा ठसा उमटविणाऱ्या दिग्दर्शकांमध्ये राष्ट्रीय पारितोषिक विजेते दिग्दर्शक नागराज पोपटराव मंजुळे आणि मकरंद शशिमधू माने ही दोन नावं ठळकपणे समोर येतात. रोजच्या जगण्याचं प्रतिबिंब, समाजातील वास्तव, सोबत मानवी भावभावना आपल्या चित्रपटांमधून दाखवताना आपल्या मातीशी असलेली नाळ या दोघांनी कायम जपली. चित्रपटसृष्टीतील हे दोन मातब्बर दिग्दर्शक आता 'बापल्योक' या मराठी चित्रपटासाठी एकत्र आले आहेत. मनाला भिडणारं कथानक आणि त्यासाठी आवश्यक असणारे कसदार कलावंत ही या दोघांच्या चित्रपटांची कायमच जमेची बाजू राहिली आहे. विशेष म्हणजे 'बापल्योक' या चित्रपटातून बाप आणि लेकाचा भावनिक विषय घेऊन येणाऱ्या दिग्दर्शक मकरंद माने यांच्या साथीला लेखक-दिग्दर्शक नागराज मंजुळे उभे राहिले आहेत. २५ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या 'बापल्योक' या चित्रपटाचे नागराज मंजुळे प्रस्तुतकर्ते आहेत.'नाईंटीनाईन प्रोडक्शन्स'चे विजय शिंदे, आणि बहुरूपी प्रोडक्शन्स'च्या शशांक शेंडे आणि मकरंद माने यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाविषयी



बोलताना नागराज सांगतात,सरणारी वर्षं आणि वाढणारा सहवास यांच्या साथीने नाती मुरत जातात. अर्थात या नात्यात सूर गवसला तर आयुष्याचा प्रवास सुफळ संपूर्ण होतो. आजवर बाप लेकाचा प्रवास तेवढ्या ताकदीने चित्रपटातून मांडला गेला नाही.
मकरंद याला हा प्रवास मांडावासा वाटला. ही गोष्ट मला भावली आणि मी चित्रपटासाठी पुढाकार घेतला. 'तिरक्या रेघेवरच असतं बापल्योकाचं नातं. ताणलं तर आयुष्यभराचं ताणतं,अन् घावलं तर?...तेच हुडकण्यासाठी आमी समदी एकत्र आलोय', असं मकरंद माने सांगतात. 'बापल्योक' चित्रपटाची कथा विठ्ठल नागनाथ काळे यांची आहे. गुरु ठाकूर आणि वैभव देशमुख यांच्या लेखणीतून साकारलेल्या गीतांना विजय गवंडे यांनी संगीत आणि पार्श्वसंगीत दिले आहे. अजय गोगावले, आनंद शिंदे, अभय जोधपूरकर यांचा स्वरसाज गीतांना लाभला आहे.छायांकन योगेश कोळी यांचे असून संकलन आशय गाताडे यांचे आहे.

# जॅक क्रॉलीने रचला इतिहास!

## » ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांची धुलाई करत केल्या 189 धावा

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**शेस मालिकेतील चौथा कसोटी सामना मँचेस्टर येथे इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया संघात खेळला जात आहे. या सामन्यातील दुसरा दिवस गुरुवारी पार पडला. दुसऱ्या दिवशी इंग्लंडच्या दोन खेळाडूंनी इतिहास रचला. पहिल्यांदा मोईन अलीने ३००० कसोटी धावा आणि २०० कसोटी विकेट्सचा आकडा पार केला. त्याचबरोबर, सलामीवीर जॅक क्रॉलीने अॅशेस कसोटीत इंग्लंडकडून एका दिवसात सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे.**



या प्रकरणात, टिप फॉस्टर पहिल्या आणि वॅली हॅमंड दुसऱ्या क्रमांकावर आहे. टिप फॉस्टरने १९०२ मध्ये सिडनी येथे खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यात एका दिवसात २१४ धावा केल्या होत्या. वॉली हॅमंडने १९३८ मध्ये लॉर्ड्सवर खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यात एका दिवसात २१० धावा केल्या होत्या. आता मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्डवर झालेल्या चौथ्या कसोटी सामन्यात जॅक क्रॉली १८९ धावा करून बाद झाला. जॅक क्रॉलीने १८२ चेंडूचा सामना करताना २१ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने १८९ धावा केल्या. त्याचबरोबर जॅक क्रॉलीने (५४ धावा) मोईन अलीसह (५४ धावा) १५२ चेंडूत १२१ धावांची भागीदारी केली. यानंतर त्याने जो रूटसोबत तिसऱ्या विकेटसाठी १७८ चेंडूत २०६ धावांची भागीदारी केली. जॅक क्रोली, मोईन अली, जो रूटच्या जोरावर इंग्लंडने चौथ्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाविरुद्ध ६७ धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत इंग्लंडने ७२ षटकांत ४ गडी गमावून ३८४ धावा केल्या होत्या. हॅरी ब्रूकने नाबाद १४ आणि कर्णधार बेन स्टोक्सने २४ धावा केल्या. मोईन अली ५४ आणि जो रूटने ८४ धावा करून बाद झाले. मोईन अलीला मिचेल स्टार्कने आणि जो रूटला जोश हेझलवूडने पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

### सलामीवीरांनी केलेली सर्वोच्च धावसंख्या

- » ३६४ धावा: लेन हटन, द ओव्हल १९३८
- » १९६ धावा: ग्रॅहम गूच, द ओव्हल १९८५
- » १९१ धावा: जेफ्री बॉयकॉट, लीड्स १९७७
- » १८९ धावा: जॅक क्रोली, ओल्ड ट्रॅफर्ड २०२३

# मॅच पाहण्यासाठी देसी जुगाड

## » हॉटेल दर परवडत नाही म्हणून हॉस्पिटलचे बुकिंग

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत १५ ऑक्टोबर रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर दोन्ही संघांमध्ये हा महामुकाबला होणार आहे. स्टेडियमची क्षमता १ लाखांपेक्षा जास्त आहे.**



### विश्वचषकातील भारताचा रेकॉर्ड उत्कृष्ट आहे

प्रथम खेळताना रोहित शर्माच्या १४० धावांच्या जोरावर टीम इंडियाने ५ गड्यांच्या मोबदल्यात ३३६ धावांची मोठी धावसंख्या उभारली. रोहितने ११३ चेंडूंचा सामना केला होता. १४ चौकार आणि ३ षटकार मारले होते. विराट कोहलीने ७७ तर के.एल. राहुलने ५७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघ ४० षटकांत ६ गडी गमावून २१२ धावाच करू शकला. पावसामुळे त्यांना ४० षटकांत ३०० धावांचे लक्ष्य मिळाले होते.

त्यामुळेच या सामन्याला चाहते मोठ्या संख्येने पोहोचण्याची शक्यता आहे. वेळापत्रक जाहीर होताच अहमदाबादची हॉटेल्स जवळपास बुक झाली आहेत आणि त्यांच्या किमतीही खूप वाढल्या आहेत. आता चाहत्यांनी देसी जुगाड बनवला आहे. हा सामना पाहण्यासाठी त्याने हॉटेलऐवजी हॉस्पिटलचे बुकिंग सुरू केले आहे.

विश्वचषक स्पर्धेचे सामने ५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहेत. ४६ दिवस चालणाऱ्या आयसीसी स्पर्धेत १० संघ सहभागी होत असून एकूण ४८ सामने खेळवले जाणार आहेत. अहमदाबाद मिररच्या बातमीनुसार, अहमदाबादमध्ये हॉटेलचे एका दिवसाचे भाडे जवळपास ५० हजारांवर पोहोचले आहे. त्याच वेळी, रुग्णालयात एक-दोन दिवस मुक्कामासाठी त्यांना ३ हजार ते २५ हजार इतकाच खर्च करावा लागणार आहे, जे हॉटेलच्या भाड्यापेक्षा सुमारे २५ हजार रुपयांनी कमी आहे. अहमदाबाद येथील बोपल क्षेत्रातील सानिध्या मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. पसार शाह यांनी सांगितले की, "रुग्णालयात ते संपूर्ण शरीर तपासणी आणि रात्रीचा मुक्काम करण्यास सांगत आहेत, जेणेकरून त्यांची दोन्ही कामे पूर्ण होतील. राहण्यासोबतच त्यांच्या शरीराची तपासणीही होईल आणि पैशांचीही बचत होईल. वर्ल्ड कपमध्ये जून २०१९ साली मँचेस्टर येथे दोन्ही संघांचा शेवटचा एकदिवसीय सामना झाला होता. या सामन्यात भारतीय संघाने डकवर्थ लुईस नियमानुसार ८९ धावांनी मोठा विजय मिळवला होता.

# आरोपींना फाशी द्या : हरभजन सिंग

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



भारताचा माजी फिरकी गोलंदाज हरभजन सिंग याने मणिपूरच्या घटनेवर संताप व्यक्त केला आहे. या घटनेतील आरोपींना शिक्षा देण्याची मागणी त्याने केली आहे. नुकताच मणिपूरमधून एक व्हिडीओ समोर आला होता; ज्यामध्ये काही लोक दोन महिलांना विवस्त्रावस्थेत घेऊन जाताना दिसत होते. मणिपूरमध्ये काही महिन्यांपासून दोन समुदायांमध्ये हिंसाचार सुरू आहे. या हिंसाचारात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

मी रागाने सुन्न झालो आहे. आज मणिपूरमध्ये जे काही घडले, त्याची मला लाज वाटते. पुढे लिहिताना हरभजन सिंगने या घटनेतील दोषींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. त्याने लिहिले, "जर या भयंकर गुन्ह्यातील गुन्हेगारांना कायद्याच्या चौकटीत आणून फाशी दिली नाही, तर आपण स्वतःला माणूस म्हणणे बंद केले पाहिजे. या घटनेनंतर संपूर्ण भारतात संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी मणिपूर पोलिसांनी सांगितले की, थौबल जिल्ह्यातील नॉन्गपोक सेकमाई पोलिस ठाण्यात अज्ञात लोकांविरुद्ध अपहरण, हत्या आणि सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय आरोपींना लवकरात लवकर जेरबंद करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याचेही पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, मणिपूरमध्ये अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या हिंसाचारात आतापर्यंत १५० हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

दादा माणूस
अजितदादा पवार
वाढदिवस विशेषांक

महाईन्यूज
लढाई सत्याची...लोकशाहीच्या हक्काची!
शनिवार, दिनांक 22 जुलै 2023
www.mahaenews.com



# रोखठोक अजितदादा...



**राष्ट्रवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री आणि माजी विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांची अवघ्या महाराष्ट्राला ओळख आहे ती परखड आणि रोखठोक बोलणारे नेते म्हणून. स्पष्टवक्तेपणा हे त्यांच्या स्वभावाचे एक असामान्य गुणवैशिष्ट आहे. राजकारणात स्पष्टपणाने बोलणाऱ्या नेत्यांची संख्या खूप कमी दिसून येते.**

*गेल्या जवळपास चार दशकांपासून राज्याच्या राजकारण आणि समाजकारणात कार्यरत असलेले, कर्तबगार, धडाडीचे आणि कर्तृत्ववान नेते म्हणून राज्याचे विद्यमान अर्थमंत्री ना. अजितदादा पवारांचे नाव उभ्या महाराष्ट्राला सुपरिचित आहे. अजितदादा हे आपल्या कामाच्या झपाट्याबरोबरच रोखठोकपणाबद्दलही प्रसिद्ध आहेत. अजितदादांच्या या परखड, रोखठोक स्वभावामुळे अनेकांना दादा संवेदनशील नाहीत, असे वाटते; पण प्रत्यक्षात तसे नाही. अजितदादा हे अत्यंत संवेदनशील मनाचे नेते आहेत. दादांकडे महाराष्ट्राच्या विकासाचे व्हिजन आहे. केंद्राच्या भक्कम साथीने प्रगतीशील महाराष्ट्राबाबत दादांनी पाहिलेले स्वप्न पूर्णत्वास जावे, हीच वाढदिनी त्यांना शुभेच्छा!*

आपल्याकडे आलेली व्यक्ती निराश होऊ नये अशा हेतूने अनेकदा राजकीय पुढारी आश्वासने देत असतात. पण यामुळे नागरीकांच्या अपेक्षा अवाजवी उंचावतात आणि आश्वासनांची पूर्तता न झाल्यामुळे त्यांचा मुखभंगही होतो. कदाचित म्हणूनच दादांनी सुरुवातीपासूनच आपली छबी रोखठोक बनवली आहे. दादांकडे कोणीही व्यक्ती कोणतेही काम घेऊन आला तर ते कामाचे स्वरुप पाहून, त्याची मागणी पाहून त्यासंदर्भातील माहिती घेतात आणि जर काम होणार नसेल तर स्पष्टपणे सदर व्यक्तीला तसे सांगतात. यामध्ये कसलाही आडपडदा ठेवत नाहीत. प्रसंगी त्या व्यक्तीला वाईट वाटले तरी चालेल, अशी दादांची भूमिका असते. याचे नागरीकांनाच नव्हे तर त्यांच्या सहकारी नेत्यांनाही याचे अप्रूप वाटते. मात्र दादा आपल्या तत्त्वापासून फारकत घेत नाहीत. मुळात अजितदादांकडे एखादे काम घेऊन आलेल्या व्यक्तीला रिकाम्या हाताने जाण्याची वेळच येत नाही. मात्र कित्येकदा काही जण अवाजवी मागण्या करतात. अशा वेळी त्यांना स्पष्ट शब्दांमध्ये तुमची ही मागणी पूर्ण होऊ शकणार नाही, त्यामध्ये या-या अडचणी आहेत, असे परखडपणाने सांगण्यास दादा मागेपुढे पहात नाहीत.

दादांचा रोखठोकपणा सार्वजनिक जीवनात अनेकदा अनुभवायला मिळाला आहे. करोना महामारीच्या काळात जेव्हा या विषाणूचे संक्रमण आटोक्यात आलेले नसतानाही अनलॉक करण्याबाबत दबाव आणला जात होता, तेव्हा दादांनी जनहिताचा विचार करुन ठामपणाने परखड भूमिका घेतली. तसेच नागरीकांनाही नियमांचे पालन करण्याबाबत खडेबोल सुनावले. त्यामुळेच पुण्यासारख्या शहरात करोना रुग्णांची संख्या नियंत्रणात राहिली.

राजकीय नेत्यांनाही दादांच्या या रोखठोकपणाचा प्रत्यय अनेकदा आला आहे. महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना शेकापचे आमदार जयंत पाटील यांनी अर्थ खात्याने केंद्र सरकारकडून बंदरासाठी आलेल्या निधीचा वापर केला नसल्याचा आरोप केला होता. तसेच अर्थमंत्री आमच्या पत्राचे उत्तरही देत नसल्याचे ते म्हणाले होते. यावर दादांनी सांगितले की, मी सकाळी 8.30 वाजताच मंत्रालयात येतो आणि सर्व कामे करतो. आपल्याकडून कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही. ते मिळाले असते तर तात्काळ संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांना बोलावून तुमचा प्रश्न निकाली काढला असता. आताही मुख्यमंत्र्यांनी मला सामान्य प्रशासन विभागाची बैठक घ्यायला सांगितले आहे. येथून जाताच ती बैठक घेणार आहे. आपण तेथे या लगेच (पान- ४ वर)




महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री
अजितदादा पवार
आपणास उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा
महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री
देवेंद्रजी फडणवीस
आपणास उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा
तुषार गजानन कामठे
नगरसेवक पिं.चिं. मनपा

# रोखठोक अजितदादा...



(पान- २ वरुन)

तुमचा प्रश्न निकाली काढू.

एखादे काम करताना ते काम कुणाचे आहे, ते लोक कोणत्या पक्षाचे आहेत, हे दादा कधीच पाहत नाहीत. ते काम लवकरात लवकर आणि दर्जेदार झाले पाहिजे, असाच अजितदादांचा प्रयत्न असतो.

मागील काळात उपमुख्यमंत्री असताना पुण्यातील पोलिस मुख्यालयाच्या कामाची पाहणी करण्यासाठी गेले असता दादांनी थेट आयुक्तांना परखड शब्दांत सुनावले होते. ‘मी लय बारीक बघतो, या ठेकेदाराने पोलिसांचेच काम असे केले असेल तर बाकीच्यांचे काय’ असा रोखठोक सवालही त्यांनी विचारला. तसेच पोलिस मुख्यालयात फिरुन बांधकामातील त्रुटी दाखवून दिल्या आणि त्या सुधारण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचनाही दिल्या.

कोरोना काळात स्वयंशिस्तीचे दर्शन घडवितानाच अजितदादा कधी कधी नियमांचे पालन न करणाऱ्या कार्यकर्त्यांना चारचौघात चार खडे बोल सुनावण्यास देखील मागे पुढे पाहत नसत. पुण्यात एक कार्यकर्ता दादांना म्हणाला, दादा, तुम्हाला पुष्पगुच्छ द्यायचा आहे. त्यावर अजितदादा म्हणाले, आरे बाबा, काही तरी नियम पाळा, कोणाकडून पुष्पगुच्छ आणला. त्याला कोरोना झाला असेल किंवा नाही, याची काय माहिती? पण जरा काळजी घ्या.” सातऱ्यातही त्यांनी असाच प्रसंग घडल्यानंतर “तुमचं राष्ट्रवादीवर प्रेम आहे, असू द्या पण कोरोना आहे हे पण लक्षात ठेवा. बुके वगैरे बाजूला ठेवा,” असं म्हणत त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांनाही झाडण्यास मागेपुढे पाहिले नाही.

अजितदादांच्या या परखड, रोखठोक स्वभावामुळे अनेकांना दादा संवेदनशील नाहीत, असे वाटते; पण प्रत्यक्षात तसे नाही. अजितदादा हे अत्यंत संवेदनशील मनाचे नेते आहेत. मात्र त्यांना वावगं काही खपत नाही. उगाचच हवेतल्या गप्पा मारणे हे त्यांच्या स्वभावात नाही. नागरिकांना उगाचच हेलपाटे घालायला लावणे आणि प्रत्येक वेळी करतो-बघतो अशी आश्वासने देत गाजर दाखवणे याचा त्यांना मनस्वी राग आहे. त्यामुळेच जनता दरबारातही दादांकडे नागरिकांची झुंबड पहायला मिळायची. कारण येणाऱ्या प्रत्येकाला आपल्या कामाबाबतचे स्पष्ट उत्तर मिळायचे. आज नव्याने राजकीय मांडणी करुन अजितदादा राज्याच्या अर्थमंत्रीपदी विराजमान झाले आहेत.

**दादांकडे महाराष्ट्राच्या विकासाचे व्हिजन आहे. महाराष्ट्र शहरीकरणाबाबत अग्रेसर असला तरी आजही इथल्या अर्थव्यवस्थेची आणि लोकसंस्कृतीची नाळ ग्रामीण कृषीव्यवस्थेशी जुळलेली आहे. दादाही याच कृषीसंस्कृतीत वाढलेले आहेत. त्यामुळे तळागाळातील लोकांचे प्रश्न, काबाड कष्ट करणाऱ्या मजुरांच्या समस्या, महिलांचे प्रश्न, शिक्षणाचे प्रश्न यांसह रोजगारासाठी आवश्यक असणाऱ्या उद्योगधंद्यांच्या विकासाचे पैलू दादांना मूलतः अवगत आहेत. केंद्राच्या भक्कम साथीने प्रगतीशील महाराष्ट्राबाबत दादांनी पाहिलेले स्वप्न पूर्णत्वास जावे, हीच वाढदिनी त्यांना शुभेच्छा !**




पिंपरी चिंचवड शहराचे भाग्यविधाते,
महाराष्ट्र राज्याचे कर्तबगार उपमुख्यमंत्री.
मा. श्री.
अजितदादा पवार
आपणास उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा
नगरपालिका भवन
पिंपरी चिंचवड महानगरपालिक
संदीप रमणनाना पवार
सामाजिक कार्यकर्ता, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी-चिंचवड

**शासन आणि प्रशासन ही एका रथाची दोन चाके असतात. परंतु लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये कोणत्याही सरकारची जनमानसातील प्रतिमा ही प्रशासनाच्या भूमिकेवर अवलंबून असते. त्या प्रतिमेला कुठेही तडा जाणार नाही यासाठी राज्यकर्त्यांची प्रशासनावर पकड असणे गरजेचे असते. या परिप्रेक्ष्यातून पाहताना राज्याच्या राजकारणातील असे नेतृत्व म्हणून विद्यमान अर्थमंत्री अजितदादांचे नाव ठळकपणाने आणि आदराने घेतले जाते. दादांच्या आजवरच्या सर्व कारकिर्दीवर नजर टाकल्यास प्रशासन हे वायूगतीने कार्यरत राहिलेले दिसून आले. कदाचित म्हणूनच ते सर्वाधिक कार्यक्षम नेते म्हणून ओळखले जातात.**

# प्रशासनावर पकड असणारा
# कर्तृत्ववान नेता



महाराष्ट्राच्या इतिहासाचा आढावा घेतल्यास यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, शरद पवार, शंकरराव चव्हाण या माजी मुख्यमंत्र्यांची राज्याच्या प्रशासनावर घट्ट पकड असल्याचे दिसून येते. प्रशासन कार्यक्षम आणि पारदर्शक असेल तर ते जनताभिमुख होतं, या भूमिकेतून या सर्व नेत्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांतूनच महाराष्ट्राचं प्रशासन आदर्श म्हणून गणलं जात होतं. तीच परंपरा पुढे घेऊन जाण्याचे काम आज राज्याचे अर्थमंत्री अजितदादा पवार करत आहेत. आजघडीला प्रशासनावर उत्कृष्ट नियंत्रण असणारा अजित दादांसारखा दुसरा नेता राज्यात शोधून सापडणार नाही. दादांची प्रशासनावर अत्यंत मजबूत पकड असल्याने अधिकारी दादांपुढे जास्त बोलत नाहीत, हे गेल्या दीड-दोन दशकांत दिसून आले आहे. यामागे दबावशाही नाही; तर दादांना आपल्यापेक्षा कायदेकानून जास्त सांभाळली.

शासन आणि प्रशासन ही एका रथाची दोन चाके असतात. परंतु लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये कोणत्याही सरकारची जनमानसातील प्रतिमा ही प्रशासनाच्या भूमिकेवर अवलंबून असते. त्या प्रतिमेला कुठेही तडा जाणार नाही यासाठी राज्यकर्त्यांची प्रशासनावर पकड असणे गरजेचे असते. अन्यथा अधिकारी बोले आणि सरकार चाले अशी अवस्था निर्माण होते. मागील काळात आपण असा अनुभव अनेकदा घेतला आहे. याउलट अजितदादांची कार्यपद्धती आहे. प्रशासनाकडून कसे काम करुन घ्यायचे आणि जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक कशी करायची याची अचूक जाण दादांना आहे. सर्वांना एकत्र घेऊन राज्याचं व्यापक हित आणि राज्यातील जनतेचं कल्याण लक्षात घेऊन अधिक सकारात्मक पद्धतीने काम केलं पाहिजे हे अजित दादांचं मत आहे.

प्रशासन जर गतिमान असेल तर नागरिकांच्या अनेक समस्यांचे निराकरण होते. याउलट प्रशासनाची गती मंद असल्यामुळेच आपल्याकडे 'सरकारी काम, सहा महिने थांब' यांसारख्या म्हणी विकसित झाल्या. दादांनी याला फाटा देण्याचा प्रयत्न केला. कोणतेही काम पेन्डिंग न ठेवता एक घाव दोन तुकडे करण्याचाही त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे नागरिकांकडून एखादा प्रश्न किंवा समस्या घेऊन आल्यानंतर दादा माहीत असतात, हे अधिकाऱ्यांनाही एव्हाना लक्षात आले आहेत. यामुळेच दादांनी महाराष्ट्रातील सत्तेतील अनेक महत्त्वाची पदे धडाडीने व ताकदीने तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करतात आणि तो प्रश्न मार्गी लावतात. 'हे काम लवकरात लवकर झाले पाहिजे आणि झाल्यानंतर मला तसे कळवा' असे अधिकाऱ्यांना ठणकावून सांगायलाही दादा विसरत नाहीत. इतकेच नव्हे तर एखाद्या अधिकाऱ्याने छोट्या गोष्टीसाठी एखाद्या व्यक्तीचे काम प्रलंबित ठेवले आणि त्यासाठी त्याला पुन्हा हेलपाटा घालायला लावला आहे, असे निदर्शनास आले तर दादा त्या अधिकाऱ्याला खडे बोल सुनावतात. आपण जनतेचे सेवक आहोत, हे विसरु नका. छोट्या-छोट्या गोष्टींसाठी नागरिकांना चकरा मारायला लावू नका, हे निःक्षून सांगतात.

मध्यंतरी, पुणे जिल्ह्यातील कोरोना स्थितीचा आढावा घेण्यासाठी अजितदादांनी पुण्यातील विधानभवनात बैठक घेतली होती. राज्यातील सर्व आमदारांना कोरोनाविषयक बाबींसाठी आमदार निधीतील एक कोटी रुपये खर्च करण्यासाठी राज्य सरकार मंजूरी देईल, असे आश्वासन दिले होते. काही तासांत त्याची पूर्तता त्यांनी केली. रात्री आमदार निधीतून एक कोटी रुपये कोरोनाविषयक कामावर खर्च करण्यास परवानगी देणारा शासन आदेश (जीआर) राज्याच्या नियोजन विभागाने काढला. पूर्वी ही मर्यादा पन्नास लाख रुपये होती. हा निधी फक्त पीपीई कीट,

(पान- ८ वर)





# महाराष्ट्राचे तडफदार, अभ्यासू नेतृत्व..!

अलीकडील काळात राज्याच्या राजकारणात घडवून आणलेल्या परिवर्तनांमधून त्यांच्या राजकीय चाणाक्षपणाची चुणूक दिसून आली असली तरी मूलतः ते कुशाग्र बुद्धीचे, अभ्यासू आणि कार्यक्षम नेते आहेत. 2014 ते 2019 या पाच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात त्यांनी नव्या युगातील महाराष्ट्राच्या उभारणीसाठी केलेले प्रयत्न दूरगामी परिणाम करणारे ठरले. आताही उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री म्हणून कार्यरत असताना सरकारला व्हिजन देण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. व्यापक जनाधार लाभलेला लोकनेता म्हणून त्यांनी मिळवलेले स्थान इतिहासात नोंदवले जाणार आहे. वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा !

> आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणात राजकीय नेत्यांची जी नवी फळी उभी राहिली त्यामध्ये अग्रक्रमाने ज्यांचा नामाल्लेख करावा लागेल असे व्यक्तिमत्व म्हणजे राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस...



महाराष्ट्राचे विद्यमान उपमुख्यमंत्री आणि अफाट लोकप्रिय नेते म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांचा आज वाढदिवस. गेल्या 8-10 वर्षांमध्ये या तरुण नेत्याने महाराष्ट्रातील राजकारण-समाजकारणावर आपला अवीट ठसा उमटवला आहे. त्यामागे त्यांच्यात असणारी अपार कष्टाची तयारी, अभ्यासूपणा, संयम, सचोटी आणि सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची भूमिका कारणीभूत आहे. देवेंद्रजींचा राजकीय प्रवास हा अत्यंत उल्लेखनीय राहिला आहे. त्यांचे शालेय शिक्षण सुरुवातीला इंदिरा कॉन्व्हेंट या शाळेत झाले. पुढे त्यांच्या वडिलांना मिसा कायद्यांतर्गत अटक झाल्यावर त्यांनी ही शाळा सोडली आणि सरस्वती विद्यालयात दाखल झाले आणि तिथे शालेय शिक्षण पूर्ण केले. पुढे धरमपेठ येथील कनिष्ठ महाविद्यालयात दाखल झाले. बारावीनंतर त्यांनी कायद्याच्या क्षेत्रात पुढील शिक्षण घ्यायचे ठरवले. पाच वर्षांचा कायद्याचा अभ्यासक्रम त्यांनी 1992 साली पूर्ण केला. फडणवीस यांनी व्यवस्थापन क्षेत्रात अभ्यासक्रम पूर्ण केला आहे तसेच या क्षेत्रात उच्चतम ज्ञान त्यांनी बर्लिन इथे जाऊन संपादित केले आहे. बर्लिन इंटरनॅशनल डेव्हलपमेंट संस्थेचा विशेष अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला. शिक्षणाच्या क्षेत्रातील कायदा किंवा व्यवस्थापन यापैकी कोणतेही ज्ञान हे सुसंगत ठरले. नागपूर परिसरात आणि विद्यापीठ क्षेत्रात ते अत्यंत हुशार, तल्लख बुद्धी आणि कार्यक्षम विद्यार्थी असा त्यांचा लौकिक होता.

**विद्यार्थी चळवळीतून कार्याला सुरूवात**

देवेंद्र फडणवीस यांनी राजकारण आणि समाजकारण यात पावले टाकली ती विद्यार्थी चळवळीतून. महाविद्यालयात शिकत असताना प्रथमतः ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक बनले आणि पुढे महाविद्यालयात गेल्यावर ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषद या संघटनेचे सक्रीय कार्यकर्ते झाले. विविध सामाजिक उपक्रम, चळवळी तसे शैक्षणिक प्रश्नावरील आंदोलने यातही ते सक्रीय होते. ज्ञान, चारित्र्य व एकता हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ध्येय असून त्या दृष्टीने त्यांनी आपली अखंड साधना चालू ठेवली आणि हळूहळू त्यांच्या नेतृत्वाचा कलाकलाने विकास होत गेला. वडिलांची शिस्त, आईचे संस्कार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील प्रभावशाली वातावरण यातून फडणवीस यांच्या चारित्र्य आकारास आले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यास प्रारंभ करताना, गती देताना त्यांनी मूलगामी संघटन कार्याचे धडे घेतले आणि या संघटन कार्यात त्यांनी प्रवास, भेटी, अभ्यास, बैठका याद्वारे राष्ट्र जीवनाची विविध क्षेत्रांची संपूर्ण माहिती घेतली. या काळात त्यांनी पांचजन्य, विवेक, ऑर्गनायझर, तरुण भारत इत्यादी नियतकालिकातून अभ्यासपूर्ण विचारमंथन घडविले तसेच प्रतिक्रियाही व्यक्त केल्या. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून भारतीय जनता पक्षाकडे वळले आणि भारतीय जनता मोर्चाचे राज्य अध्यक्ष बनले. त्यापुर्वी नागपूर शहरातील महापालिकेत नेतृत्व केले आणि नागपूरचे महापौरही झाले. भारतातील दुसरे तरूण महापौर असा लौकिक त्यांना मिळाला आणि त्याला साजेसे कार्य त्यांनी केले.

**प्रदेशाध्यक्षपदाची यशस्वी कारकीर्द**


1999 साली ते महाराष्ट्र विधानसभेत निवडून आले आणि पुढे सातत्याने 2014 पर्यंत विधीमंडळात प्रतिनिधित्त्व केले. भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चा प्रमाणे प्रदेशाध्यक्षपदही त्यांच्याकडे चालून आले आणि प्रदेशाध्यक्ष या नात्याने पक्षात नव चैतन्य आणण्यातही ते यशस्वी ठरले. प्रथम 2014 साली लोकसभा निवडणूक आणि त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणूक भारतीय जनता पक्षाला जे घवघवीत यश मिळाले त्या यशामध्ये देवेंद्रजींचा वाटा मोठा होता. विधीमंडळ नेतेपदी एकमताने निवड झाल्यानंतर 31 ऑक्टोबर 2014 रोजी त्यांनी राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची सुत्रे हाती घेतली. सातत्याने कार्यरत राहून पाच वर्षाच्या कार्यकाळात त्यांनी राज्याच्या राजकारण आणि समाजकारणावर विलक्षण छाप टाकली. शेती, उद्योग, शिक्षण, संस्कृती, अर्थकारण अशा अनेक क्षेत्रात त्यांनी महाराष्ट्राचा सकल अंगाने अभ्यास केला आहे. विशेषतः शेती प्रश्नावरील त्यांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांच्यानंतर शेतीचा प्रश्नाचा एवढा सूक्ष्म आणि बारकाईने अभ्यास करणारे मुख्यमंत्री म्हणून इतिहासात त्यांचीच दखल घ्यावी लागेल.

**जलयुक्त शिवार अभिनव उपक्रम**

जलयुक्त शिवार हा एक अभिनव उपक्रम आखला केवळ घोषणांनीच नव्हे तर प्रत्यक्ष कृतीनेच जलयुक्त शिवाराचा प्रकल्प प्रत्यक्षात आणला त्यासाठी चांद्यापासून बांद्यापर्यंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रवास करून आणि स्वतः श्रमदान करून त्यांनी जलयुक्त शिवाराच्या प्रस्थापनेत महत्त्वाचे योगदान दिले. जलयुक्त शिवाराची कामे त्यांनी इतक्या बारकाईने पाहिली त्यामुळे राज्यात शेतीचे उत्पादन वाढले आणि शेतीच्या सिंचनाचा साठासुद्धा वाढला. पुर्वी राज्यातील शेती धरणाच्या पाण्यावरच अवलंबून होती. फडणवीस यांनी हे ओळखले की सिंचनाची क्षमता कमी होत आहे. अशावेळी उपलब्ध पाणी कसे साठवता येईल त्यासाठी त्यांनी शेततळ्यांच्या योजनेला गती दिली आणि जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत ठिकठिकाणी पाण्याचा साठा करून भूजल पातळी उंचावण्यासाठी प्रयत्न केले. परिणामी आटलेल्या नद्या भरून वाहू लागल्या. पूर्णपणे मोकळ्या झालेल्या विहीरी पाण्याने भरू लागल्या. हा सर्व चमत्कार फडणवीस यांच्या भगीरथ प्रयत्नातूनच घडून आला.

कुठलेही नेतृत्त्व ज्या सामाजिक जीवनातून विकसित होते त्या समाजाचा प्रभाव नेतृत्त्वावर पडणे स्वाभाविक असते. नागपूर परिसरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यसंस्कृतीचा प्रभाव देवेंद्र फडणवीस यांच्यावर पडलेला आहे. त्यानी प्रारंभीच्या काळात, संघ, अभाविप, आणि भाजप मध्ये जी कामे केली त्या कामाची बैठक त्यांना राज्याचे नेतृत्त्व करण्यास मार्गदर्शक ठरली आहे. विकासाचे राजकारण पुढे नेत असताना समाजातील दुःखी, कष्टी आणि पददलित माणसाची दुःखे समजावून घेण्यात ते समर्थ आहेत. मागील काळात, मी मुख्यमंत्री बोलतोय या कार्यक्रमातील त्यांची भाषणे ऐकली असता त्यांच्या अभ्यासू नेतृत्त्वाचे प्रतिबिंब या सर्व भाषणात उमटले असल्याचे दिसून येते. शाश्वत विकास हा त्यांच्या चिंतनाचा विषय असल्याचे दिसून येते. त्यांनी सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाला गती देण्यासाठी राज्यातील शेती, उद्योग, शिक्षण या मूलभूत समस्यांचा सखोल आणि सूक्ष्म अभ्यास करून या संदर्भात आपली समीकरणे विकसित केली आहेत.

येत्या काळात राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत काम करताना त्यांच्या आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कल्पनेतील विकासाचे स्वप्न साकार होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना..!



भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवड.






# सर्वसामान्यांशी नाळ जोडलेला संवेदनशील नेता




(पान- ६ वरुन)

व्हेंटीलेटर, आयसीयू बेड, कोरोना टेस्टींग किट, थर्मामीटर, फेसमास्क,सॅनिटायझर, ग्लोव्हज आणि आरोग्य व वैद्यकीय विभागाने सुचविलेल्या कोरोनाच्या तत्सम साहित्य खरेदीसाठीच वापरला जात होता.

दुसरी एक घटना म्हणजे, आमदार निधीतून 25 लाखांची रेमडिसिवीर खरेदी करून ती पिंपरी-चिंचवड पालिकेला देण्याचा प्रस्ताव चिंचवडचे भाजपचे तत्कालीन आमदार दिवंगत लक्ष्मण जगताप यांनी दिला होता. पण तो अनुज्ञेय नसल्याचे कारण देत जिल्हाधिकाऱ्यांनी नाकारला होता. यावर विशेष बाब म्हणून या खरेदीस परवानगी देण्याची मागणी जगताप यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दादांकडे केली होती. कोरोना महामारी आणि समाजहिताचा प्रश्न ध्यानात घेऊन दादांनी ही मागणी तत्पर मान्यही केली.

अशी शेकडो-हजारो उदाहरणे सांगता येतील. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत तर अजितदादा कामचुकार अधिकाऱ्यांना अनेकदा धारेवर धरत असतात. शेतकरी हा अन्नदाता आहे, याची जाणीव ठेवा असे सांगत असतात. इतकेच नव्हे तर प्रशासनातील अधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी नागरिकांशी आपुलकीने, प्रेमाने वागायला हवे हेही त्यांचे नेहमी सांगणे असते. त्यामुळेच दादांच्या आजवरच्या सर्व कारकिर्दीवर नजर टाकल्यास प्रशासन हे वायूगतीने कार्यरत राहिलेले दिसून आले. कदाचित म्हणूनच ते सर्वाधिक कार्यक्षम नेते म्हणून ओळखले जातात. आताही राज्य सरकारमध्ये सामील झाल्यानंतर खातेवाटप झाला आणि वित्तखात्याची जबाबदारी दादांकडे देण्यात आली, त्यानंतर लगेचच त्यांनी अर्थखात्यातील अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन आपल्या कामाला सुरुवात केली. सकाळी लवकर कामाला सुरुवात करणे हा दादांचा शिरस्ता आहे. तसेच कोणत्याही कामाविषयी, प्रकल्पाविषयी मुलभूत माहिती घेऊन त्याचे सर्व पैलू तपासून तात्काळ ते काम पूर्णत्वास कसे जाईल यावर दादांचा सदैव भर राहिला आहे.

अजितदादा हे सात वेळा बारामती मतदारसंघातून विजयी झाले आहेत. इतकी वर्षे सातत्याने एका मतदारसंघातून विजयी होणे ही आजच्या सुजाण आणि सजग मतदारांच्या काळात दुर्मिळ बाब आहे. पण दादांना ही किमया केवळ साध्यच झाली नाही, तर 2019 च्या विधानसभा निवडणुकीत दादांच्या सर्वच्या सर्व विरोधकांचे डिपॉझिट जप्त झाले. मागील सर्व निवडणुकींमधील मताधिक्याचे विक्रम मोडीत काढून दादा विजयी झाले. हा प्रचंड जनादेश दादांच्या कर्तृत्वावर शिक्कामोर्तब करणारा आहे.

दादांच्या कार्यपद्धतीबाबत, कामाच्या आवाक्याबाबत, धडाडीबाबत सर्वच राजकीय पक्षांचे नेते आदर बाळगून आहेत, हीच दादांची किमया आहे. अशा या कर्तृत्ववान नेत्याला दीर्घायुष्य लाभो आणि त्यांची स्वप्नपूर्ती होवो, हीच वाढदिनी शुभकामना..!